पक्षाला दिले जाते. खाद्य विकत घेताना किंवा बनविताना ते संतुलित अन्न घटक असणे अत्यंत गरजेचे आहेत. खाद्य बनविताना वेगवेगळे पक्षी तसेच त्यांचे वय यांची काळजी घेतल्या जाते. कारण वयानुसार व वेगवेगळया पक्षांच्या जातीनुसार त्यांची प्रथिने, ऊर्जा व मिनरल्सची गरज वेगवेगली असते.

ब्रॉयलर पक्षी

	प्रिस्टार्टर (० ते ७ दिवस)	स्टार्टर (८ ते २१ दिवस)	फिनीशर (२२ ते ४२ दिवस)
प्रथिने (%)	२३	२२	२०
उर्जा (कि. कॅलरी/कि.ग्र.)	३०००	३१००	३२००
कॅल्शियम (%)	१	१	१
फॉस्फोरस (%)	०.४५	०.४५	०.४५

लेयर / अंडी देणारे पक्षी

	चिक (० ते ८ आठवडा)	ग्रोवर (९ ते २० आठवडा)	लेअर (२१ ते ४५ आठवडा)	लेअर (४६ ते ७२ आठवडा)
प्रथिने (%)	२०	१६	१८	१६
उर्जा (कि.कॅलरी /कि.ग्रॅ.)	२८००	२५००	२६००	२४००
कॅल्शियम (%)	१	१	१	३.५
फोस्फारस (%)	०.४५	०.४०	०.४०	०.४०

त्यामुळे खाद्य विकत घेताना नामवंत कंपनीकडून खाद्याची खरेदी करावी. अथवा तज्ञांच्या सल्ल्याने संतुलित खाद्य स्वतः तयार करावे.

लस व लसीकरण :

कुक्कुटपालनात लसीकरणास अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे पक्षी साथीचे रोग व संक्रमण रोगांना बळी पडू नये यासाठी लसीकरण करणे हा एकमात्र उपाय आहे. पक्षांना मुख्यतः रोग अतिसुक्ष्म विषाणूमुळे होत असतात व या रोगावर कोणताही उपाय करता येत नाही. यामुळे लसीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. ब्रॉयलर पक्षी व लेअर (अंडी देणाऱ्या) पक्षांना खालील वेळापत्रानुसार लसीकरण द्यायला पाहिजे.

ब्रॉयलर पक्षांचे लसीकरण

पक्षांचे वय	रोगाचे नाव	लसीचा प्रकार	लसीचे प्रमाण	लस देण्याचा मार्ग
५ ते ७ दिवस	मानमोडी/ आर.डी.	लासोटा/ बी१/एफ१	०.०३ मिली किंवा एक थेंब	डोळ्यात किंवा नाकात
१० ते १४ दिवस	गंबोरा/ आय.बी.टी.	गंबोरा / इंटरमिडीयट प्लस	०.०३ मिली किंवा एक थेंब	डोळ्यात किंवा नाकात
१८ ते २२ दिवस	गंबोरा/ आय.बी.टी.	गंबोरा / इंटरमिडीयट प्लस	पक्षाच्या क्षमतेनुसार	पिण्याच्या पाण्यातून
२४ ते २८ दिवस	मानमोडी/ आर.डी.	लासोटा/ बी१/एफ १	पक्षाच्या क्षमतेनुसार	पिण्याच्या पाण्यातून

अंडी देणाऱ्या / गावरान पक्षांचे लसीकरण

पक्षांचे वय	रोगाचे नाव	लसीचा प्रकार	लसीचे प्रमाण	लस देण्याचा मार्ग
५ ते ७ दिवस	मानमोडी/ आर.डी.	लासोटा/ बी१/एफ	१०.०३ मिली किंवा एक थेंब	डोळ्यात किंवा नाकात
१० ते १४ दिवस	गंबोरा/ आय.बी.टी.	गंबोरा / इंटरमिडीयट प्लस	०.०३मिली किंवा एक थेंब	डोळ्यात किंवा नाकात
१८ ते २२ दिवस	गंबोरा / आय.बी.टी.	गंबोरा/इंटर मिडीयट प्लस	पक्षाच्या क्षमतेनुसार	पिण्याच्या पाण्यातून
२४ ते २८ दिवस	मानमोडी/ आर.डी.	लासोटा/ बी१/एफ १	पक्षाच्या क्षमतेनुसार	पिण्याच्या पाण्यातून
०८ ते १० आठवडे	मानमोडी/ आर.डी.	स्ट्रेन किल्ड लस, आर२बी	०.५ मिली	त्वचेतून
१२ आठवडे	चिकन एम्बिओ अडोफेड	पाऊल पिवस किंवा देवी	०.२ मिली	पंखाच्या शिरेतून

* दर ०६ महिन्यानंतर लसीकरण करावे.

लसीकरण करतेवेळी लसीची निवड, लसीचे प्रमाण, लस देण्याचा मार्ग, लसीचे द्रावण तयार करणे, लस साठवणुक वेळी लसीचे तापमान नियंत्रित ठेवणे, लसीकरणाची वेळ अशा विविध गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

घडी पत्रिका क्र. : डॉ. पंदेकृवि/प्रका/१६२५/२०२५

व्यवसायिक कुक्कूट पालन



डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

डॉ. विक्रम एस. कदम
विषय विशेषज्ञ
(पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र)

श्रीमती निलीमा पाटील
विषय विशेषज्ञ
(गृहविज्ञान)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषि विज्ञान केंद्र
सोनापूर-गडचिरोली
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७
Email - kvksonapur@gmail.com
Website - www.kvkgadchiroli.in

कुक्कुटपालन म्हणजे काय ?

अंडी व मांस उत्पादनासाठी कोंबड्या व इतर पक्षी व्यवस्थित प्रकाश, खेळती हवा असलेल्या शेडमध्ये ठेऊन शास्त्रोक्त पध्दतीने त्यांचे संगोपन व व्यवसाय करणे ह्याला कुक्कुटपालन असे म्हणतात. कुस्कुटपालनामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पक्षांचा समावेश होतो. त्यामागे कोंबडी, बदक, गिनीया फाऊल, गीज, टर्की अशा पक्ष्यांना पाळले जाते.

कोंबडीपालनाच्या पद्धती : पक्षी पालनाकरिता विविध पद्धतीचा वापर केला जातो. ब्रायलर पक्षी पालनाच्या पध्दतीचा अवलंब हा विविध गोष्टींवर अवलंबून असतो. जसे की बिक्री बाजारपेठ, रोडची क्षमता, परिसरातील पक्षीपालनाची घनता या गोष्टिंचा विचार करून योग्य पध्दतीचा वापर करावा.

एक वयोगट पालन पद्धत : (All in all out)

या पद्धतीमाये शेडच्या क्षमतेनुसार एकाच वयोगटाचे लहान पिल्ले एकाच वेळी घेतली जातात, अशा पक्षांचे पालन पोषणकरून ते पक्षी एकाच वेळी बाजारपेठेत विकली जातात. या पद्धतीला एक वयोगट पालन पध्दत म्हणतात. कोबडीपालनाच्या सर्व पध्दतीपैकी हि पध्दत फायदेशीर तसेच आरोग्याच्या दृष्टिने लाभकारक आहे.

फायदे :

- सर्व पक्षी एकाच वयोगटाचे असल्यामुळे व्यवस्थापन करण्यास त्रास हात नाही.
- या पध्दतीत रोगाचा प्रसार आणि प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो.
- या पध्दतीमध्ये पक्षी घराची व परिसराची स्वच्छता, निर्जंतुकीकरण तसेच रोगप्रतिबंधात्मक उपाय योजना करणे सोपे जाते.
- पक्षांची वाढ झपाट्याने होते, मरतूक कमी होते. खाद्याचे मांसात रूपांतर होण्याचे प्रमाण जास्त असते. (कमी एफ सी आर) त्यामुळे उत्पादन खर्च कमी होता.
- ही पद्धत प्रामुख्याने करार पध्दत कुक्कुटपालनमध्ये वापरली जाते.

अनेक वयोगट पालन पध्दत किंवा मिश्र वयोगट (Multiple Batch System)

या पध्दतीमध्ये लहान पिल्ले एका विशिष्ट कालमर्यादेनुसार म्हणजेच ७, १०, १५ दिवसांच्या अंतरावर मागवून त्यांचे पालन पोषण करून त्यांची वेळोवेळी बाजारात विक्री केली जाते, यास अनेक वयोगट पालन पध्दती म्हणतात, म्हणजेच विविध वयोगटाचे पक्षी एकाच फार्ममध्ये किंवा परिसरातील वेगवेगळ्या फार्ममध्ये पालन करणे.

फायदे :

- हि पध्दत किरकोळ विक्रीसाठी फायदेशीर आहे.
- साहित्य व उपकरणे यांचा वापर व्यवस्थितपणे करता येतो.
- शेड बांधणी खर्च २५ टक्के आणि साहित्य/उपकरणेच्या ५० टक्के खर्चात बचत करता येते.
- ज्या कुक्कुटपालकाचे स्वतःचे चिकन सेंटर आहे अशांसाठी ही पध्दत फायदेशीर आहे
- अस्थिर बाजार भावामुळे नफा किंवा तोटा मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागत नाही.

कोंबडी घराच्या पध्दती :

१) गादी पध्दत २) पिंजरा पध्दत

जागेचे प्रमाण :

पक्षांना वयोमानानुसार योग्य ती जागा पुरविणे गरजेचे आहे. अति जास्त जागा किंवा कमी जागा दिल्यास पक्षांच्या वाढीवर विपरित परिणाम होतो. सर्वसाधारणपणे पक्षांच्या योग्य वाढीसाठी खालील प्रमाणात जागा द्यावी.

ब्रॉयलर - १ चौरस फुट

अंडी देणारे पक्षी/गावरान पक्षी-२ चौरस फुट

ब्रडींग व्यवस्थापन :

अंड्यातून बाहेर आलेल्या पिल्लांना पहिल्या दिवसा पासून तीन आठवड्यांपर्यंत कृत्रिमरित्या उष्णता/उब देऊन त्यांची जोपासना करावी लागते यास ब्रडींग असे म्हणतात. ऋतुमानानुसार ब्रूडींग चा कालावधी कमी जास्त होऊ शकतो. पिल्लांना कृत्रिम उष्णता / उब देण्याकरिता विविध उपकरणांचा वापर केला जातो. त्यास ब्रूडर असे म्हणतात. ब्रूडर हे पिल्ले येण्यापूर्वी ६-८ तास अगोदर सुरू करून ठेवावीत. ब्रूडर हे जमिनीपासून दोन ते तीन फूट उंचीवर ठेवावे व आवश्यकतेनुसार त्यांची उंची कमी जास्त करावी. परंतु ते पिल्लांना स्पर्श होणार नाहीत त्याची काळजी घ्यावी. ब्रूडींग करतेवेळी पिल्लांच्या घराचे तापमान हे वयोमानानुसार खालीलप्रमाणे ठेवले पाहिजे.

१. १ आठवडा-९५°F (35°C)

२. २ आठवडा-९०°F (32.22°C)

३. ३ आठवडा-८५°F (29.44°C)

म्हणजे पहिल्या ते तिसऱ्या आठवड्यापर्यंत प्रत्येक आठवड्याला ५°F तापमान कमी करावे, बऱ्याच वेळी रोडचे तापमान व्यवस्थित ठेवणे अवघड जाते. अशा वेळी जर विजेच्या बल्बने ब्रूडर वापरल्यास प्रत्येक पिल्लांना २ व्हॅट हिवाळ्यामध्ये व १ व्हॅट उन्हाळ्यामध्ये या प्रमाणात ब्रूडरला बसवून कृत्रिम ऊर्जा द्यावी.

कृत्रिम उष्णता देतांना पिल्लांच्या हालचालींवर बारिक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आपन दिलेल्या जागेमध्ये सर्व पिल्ले सम प्रमाणात विखुरलेली असतील तर आपण दिलेली उष्णताही योग्य आहे हे लक्षात ठेवावे. जर पिल्ले ब्रूडरच्या खाली एकत्रित जमा होत असतील तर, त्यांना आणखी उष्णतेची गरज आहे. त्यासाठी आणखी एखादा बल्ब वाढवावा किंवा जास्त व्हॅटचे बल्ब लावावेत, जर ती पिल्ले ब्रूडर खालून दूरवर जात असतील तर त्यांना दिलेली उष्णता जास्त आहे हे लक्षात घ्यावे, अशा वेळी एखादा बल्ब कमी करावा किंवा ब्रूडरची उंची वाढवावी.

लिटर/गादी व्यवस्थापन : पक्षी गृहामध्ये पक्षांच्या गादीसाठी ज्या विविध कोडा/भूसा/तुस यांना बापर केला जातो त्यास लिटर म्हणतात, पिल्ले आल्यापासून ते पक्षी विक्री होईपर्यंत लिटरचा वापर करणे आवश्यक आहे. गादी पध्दतीत साळींचा भूसा वापरणे फायदेशीर ठरते. लिटरच्या थराची जाडी ०३ ते ०४ इंच या प्रमाणात ठेवावी, त्यामुळे पक्षाला उब मिळते व थंडीपासून पक्षांचे संरक्षण होते. पिल्ले आल्यानंतर लिटरवरती ०३ ते ०४ दिवस वर्तमान पत्राचा दोनदा थर द्याबा त्यामुळे पिल्ले लिटर खाणार नाहीत, लिटरमधील आर्द्रता ही २०-२५ टक्के पेक्षा अधिक प्रमाणात वाढू नये याची काळजी घ्यावी

खाद्य व्यवस्थापन : खाद्याचे प्रकार खाद्य बनविण्याच्या निर्मिती करण्याच्या प्रक्रियेमुळे खाद्याचे विविध प्रकार आहेत.

१) मॅश / भुकटी खाद्य (Mash Feed)

२) गोळी खाद्य (Pellet Feed)

३) गोळीचा चूरा खाद्य (Crumble Feed)

गोळीचा चूरा खाद्य हे प्रामुख्याने व जास्त प्रमाणात ब्रॉयलर